


दैनिक
# जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ४०० शुक्रवार दि २६ जून २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# तुकाराम मुंढेंच्या बदलीसाठी २५० कोटी गोळा? आरोपावर मंत्री नरहरी झिरवाळांचा खुलासा, मुंढेबद्दल काय म्हणाले?

**वृत्तसंस्था-मुंबई**

राज्यातील बेकायदा गुटखा विक्री, अन्नपदार्थांमधील भेसळ, बोगस औषधांच्या विरोधात धडक कारवाई सुरू केल्याने चर्चेत आलेला अन्न आणि औषध प्रशासन विभाग (एफडीए) आवश्यक संसाधनांविना अभावग्रस्त असल्याची कबुली विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी बुधवारी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ, अधिकाऱ्यांना लागणारी वाहने, कार्यालये आणि अन्न तपासणीच्या प्रयोगशाळा नसल्याची खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या काशिनाथ दाते यांनी बुधवारी विधानसभेत अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या वतीने सुरू असलेल्या धाडसत्राबद्दल लक्षवेधी सूचना मांडली होती. यावेळी झालेल्या जोरदार चर्चेला उत्तर देताना झिरवाळ यांनी विभागात असलेल्या कमतरतेची माहिती दिली. ङ्गविभागातील ३५० मंजूर पदांपैकी ३१६ कार्यरत असून ४३ रिक्त आहेत. औषध निरीक्षकांची





२०० पदे मंजूर असून यापैकी १५९ पदे भरलेली नाहीत. अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांची १९७ पदे भरली आहेत. औषध निरीक्षक पदासाठी ४०० कर्मचाऱ्यांची गरज आहे. केंद्र सरकारच्या धोरणानुसार एक हजार अन्न आस्थापनांना एका अधिकाऱ्याची आवश्यकता आहे. त्यानुसार राज्यात ११०० कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. जिल्हास्तरावर विभागाची कार्यालये नाहीत, अशी खंत झिरवाळ यांनी व्यक्त केली. एफडीएची स्वतःची अशी प्रयोगशाळा नाही. सध्या करार केलेल्या २२ प्रयोगशाळांकडून अन्न नमुन्यांची तपासणी केली जाते. नाशिक, पुणे, नागपूर आणि यवतमाळ येथे विभागाची स्वतः ची प्रयोगशाळा लवकरच सुरू केली जाईल. तर रायगड येथील पेण आणि यवतमाळसाठी जागा शोधण्याचे काम सुरू आहे. अधिकाऱ्यांसाठी विभागाकडे स्वतःची अशी वाहने नाहीत. त्यामुळे विभागाच्या बळकटीकरणासाठी भाडेतत्त्वावर वाहने घेतली जातील. विभागासाठी नवी पदे निर्माण होत नसल्याने खालची यंत्रणा काम करत नाहीफ, हे झिरवाळ यांनी मान्य केले.

मुंढेंच्या बदलीसाठी २५० कोटी गोळा

अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांची बदली करण्यासाठी औषध कंपन्यांनी २५० कोटी रुपये गोळा केल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी केला. या प्रश्नाला उत्तर देताना, मुंढे हे चांगले काम करत असून त्यांना थांबवले जाणार नाही अथवा त्यांची बदली केली जाणार नसल्याचे झिरवाळ यांनी स्पष्ट केले.

# संजय दिना पाटील यांची पत्रकारांना धमकी आणि शिवीगाळ, एकनाथ शिंदे यांची पहिली प्रतिक्रिया

**वृत्तसंस्था-मुंबई**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षात प्रवेश करणारे ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांनी शिवीगाळ केली आहे. संजय दिना पाटील यांच्या या कृत्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. आपलं या विषयावर संजय दिना पाटील यांच्यासोबत चर्चा झाली, असल्याचं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे. पत्रकारांबाबत त्यांनी केलेलं वक्तव्य चुकीचं आहे. आपण त्यांना दिलगिरी व्यक्त करण्यास सांगितलं असल्याचं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं. तर मंत्री संजय शिरसाट यांनी संजय दिना पाटील यांच्या वतीने आपण माफी मागत असल्याचं म्हटलं.

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत रोज संजय दिना पाटील यांच्या विरोधात बोलतात. रोज त्यांच्याबद्दल अपशब्द काढतात. तोडून टाका, मारुन टाका, घरात घुसा आणि अतिशय खालच्या दर्जाच्या नीच दर्जाचे शब्द मीडियासमोर वापरतात. खरं म्हणजे हा मीडियाचादेखील अपमान आहे. किती वेळापासून काय-काय बोलतात ते आपण पाहिलेलं आहे. याचा राग संजय दिना पाटील यांच्या मनामध्ये आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले. संजय दिना पाटील यांच्या मनात पत्रकारांबाबत कोणताही राग नाही. पत्रकारांच्याबाबत अशा प्रकारचे वक्तव्य आमच्यासारख्या कोणत्याही लोकप्रतिनिधीने करुही नये. त्यामुळे मी त्यांना सांगितलं आहे की, आपल्याकडून पत्रकारांचा अपमान करणारे काही शब्द गेले असतील तर आपण पत्रकारांशी बोलून दिलगिरी व्यक्त केली पाहिजे, अशी प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली. संजय शिरसाट म्हणाले, मी माफी मागतो संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना वेडं-वाकडं बोलले असतील तर मी त्यांच्यातर्फे माफी मागतो. दिना पाटील यांनाही आम्ही आमच्या पद्धतीने बोलू. एखाद्या वेळेत फ्रस्टेशन किंवा जास्त राग आल्यामुळे ते तसं बोलले असतीलङ्गङ्ग, अशी प्रतिक्रिया मंत्री संजय शिरसाट यांनी दिली आहे.



याचं समर्थन करता येणार नाही गेल्या तीन-चार दिवसांपासून संजय दिना पाटील आणि संजय राऊत यांच्यत वाकयुद्ध चालू आहे. कुणी बॉम्बने उडवून देण्याची धमकी देत आहे. कुणी फोटो काढवून दाखवत आहे, या अशा प्रकारच्या घटना आम्हाला बघायला मिळत आहेत. या अशा प्रकारच्या घटना आम्हाला पाहायला मिळत आहेत. याचं समर्थन कुणीही करणार नाही, असं स्पष्ट मत संजय शिरसाट यांनी व्यक्त केलं.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विकासाच्या धुळीत गुदमरलेली शहरे



राज्यात मोठ्या प्रमाणात शहरीकरण सुरू असल्याने शहरांकडे होणारे स्थलांतर वाढले आहे. शहरांत घरनिर्मिती आवश्यक ठरत आहे. सध्या सर्वत्र सोसायट्यांच्या पुनर्विकासाची कामे तसेच नवीन लहान मोठे गृहनिर्माण प्रकल्प सुरू आहेत. तसेच महापालिकेमार्फत अनेक काँक्रीट रस्त्यांची कामे सुरू आहेत. भुयारी गटारांची कामे व देखभाल सुरू असल्याने अनेक ठिकाणी रस्ते खोदण्यात आल्याचे दिसून येते. वाहनांच्या पार्किंगसाठी अनेक गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये तळघरांची निर्मिती करण्यात येत असून त्यासाठी मोठ्या प्रमाणात माती खोदकाम आणि माती वाहतूक केली जात आहे. बांधकाम म्हटले की माती खुदाई होणारच. काँक्रीटची वाहतूक ट्रान्झिट मिक्सरद्वारे केली जाते. सिमेंट, वाळू आणि खडी यांची वाहतूक करावी लागते. इमारत बांधकामात सिमेंटसह निर्माण होणारी सूक्ष्म धूळ वाऱ्यासोबत परिसरात पसरते. काही ठिकाणी काँक्रीट ग्राइंडिंगची कामे चालू असतात, त्यामुळे सिमेंट डस्ट पुन्हा वातावरणात मिसळते. काही ठिकाणी आगाऊ जमा झालेले काँक्रीट तोडले जाते. इमारतींमध्ये टाइलिंग करताना मोठ्या प्रमाणात डेब्रिज तयार होते आणि ते गार्बेज टनेलमधून खाली फ ेकले जाते. खुदाईनंतर मातीची शहराबाहेर वाहतूक करताना ती डम्परमधून आजूबाजूला पसरते. एकंदर बांधकाम प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर धूळ निर्माण होत असते. पावसाळ्यात हीच माती आणि बांधकामातील अवशेष गटारांमध्ये जाऊन पाणी निचरा व्यवस्थेवर ताण आणतात आणि अनेक भागांत पाणी साचण्याच्या समस्या निर्माण होतात. बांधकाम प्रक्रियेदरम्यान निर्माण होणारे ध्वनिप्रदूषणही तितकेच गंभीर आहे. ड्रिलिंग, पाइलिंग, ब्रेकर मशीन, भुयारी मार्ग खोदणारी मशीन्स आणि काँक्रीट मिक्सरमधून निर्माण होणारा मोठा आवाज विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर, रुग्णालय परिसरातील रुग्णांवर तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करत आहे. भुयारी मार्ग खोदकाम करताना खूप मोठ्या प्रमाणात माती व दगडांची वाहतूक करण्यात येत असल्याने धुळीचे प्रमाण वाढत चालले आहे. मुंबईसह अन्य शहरांमध्ये सुरू असलेल्या वेगवान बांधकामांनी शहरांचे रूप बदलले असले, तरी या विकास प्रक्रियेत उडणारी धूळ (कन्स्ट्रक्शन डस्ट) आता गंभीर सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न ठरत आहे. रस्ते रुंदीकरण, मेट्रो प्रकल्प, उंच इमारती, पुनर्विकास आणि पायाभूत सुविधांच्या कामांतून हवेत मिसळणारी सिमेंट, वाळू, चुनखडी आणि धातूंची सूक्ष्म धूळ श्वसनमार्गातून थेट मानवी शरीरात प्रवेश करत आहे. यातून आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होत असून, त्याचा सर्वाधिक फटका बांधकाम क्षेत्रातील कामगारांना बसतो. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या () आकडेवारीनुसार, शहरी भागांतील पीएम १० आणि पीएम २.५ प्रदूषणात बांधकाम क्षेत्राचा वाटा ३० ते ४० टक्क्यांपर्यंत आहे. ही सूक्ष्म कणधूळ फुफ्फुसांमध्ये खोलवर साचते. पीएम २.५ कणांचा आकार २.५ मायक्रॉनपेक्षा कमी असल्याने ते रक्तप्रवाहातही प्रवेश करू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेने स्पष्ट केले आहे की, दीर्घकाळ या कणांच्या संपर्कात राहिल्यास दमा, क्रॉनिक ब्रॉन्कायटिस, हृदयविकार, स्ट्रोक तसेच अकाली मृत्यूचा धोका वाढतो. भारतातील आयसीएमआर आणि जीबीडी (ग्लोबल बर्डन ऑफ स्टडीज) अभ्यासानुसार, वायुप्रदूषणामुळे होणाऱ्या आजारांमुळे देशात दरवर्षी १५ ते १६ लाखांहून अधिक अकाली मृत्यू होतात. यातील मोठा हिस्सा शहरी बांधकाम-संबंधित धुळीशी जोडलेला असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. मुंबई, दिल्ली, पुणे, बेंगळुरू यांसारख्या शहरांमध्ये हिवाळ्यात व कोरड्या हंगामात बांधकामस्थळांजवळील पीएम १० पातळी परवानगीपेक्षा दुपटीने वाढली आहे. बांधकाम प्रकल्पावर निर्माण होणाऱ्या धुळीचा सर्वाधिक फटका बांधकाम कामगार, रस्त्यालगत राहणारे नागरिक, वृद्ध, लहान मुले आणि दमा किंवा हृदयविकार असलेल्या रुग्णांना बसतो. मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या निरीक्षणानुसार, गेल्या काही वर्षांत श्वसनविकारासाठी बाह्यरुग्ण विभागात येणाऱ्या रुग्णसंख्येत २० ते २५ टक्क्यांची वाढ दिसून आली आहे. डोळ्यांची जळजळ, त्वचारोग, सतत खोकला, केस गळती आणि श्वासोच्छ्वासाचा त्रास ही लक्षणे सामान्य होत चालली आहेत. बांधकाम कामगारांसाठी नियमित फुफ्फुस तपासणी, आरोग्य विमा, दर्जेदार मास्क आणि सुरक्षितता प्रशिक्षण अनिवार्य करण्याची गरज आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# ॲमेझॉनला महाराष्ट्रात गुंतवणुकीच्या मोठ्या संधी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँड्री जेसी यांची मुख्यमंत्र्यांशी भेट

**मुंबई/वृत्तसंस्था**

'डेटा सेंटर्स' क्षेत्रात महाराष्ट्र ही देशाची राजधानी आहे. डेटा सेंटरचा विस्तार आणि विकासासाठी राज्यात उत्तम परिसंस्था निर्माण करण्यात येत आहे. केवळ डेटा सेंटर्स नाही, तर राज्यात आरोग्य, तंत्रज्ञान विषयक पायाभूत सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कौशल्य विकास यामध्ये मोठ्या गुंतवणुकीच्या संधी आहेत. त्यामुळे ॲमेझॉनने राज्यामध्ये गुंतवणूक करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

हॉटेल ताज पॅलेस येथे ॲमेझॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अँड्री जेसी यांच्या समवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील गुंतवणुकीच्या संधीवर चर्चा केली. यावेळी मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्री यांचे



गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बळगन, विकास आयुक्त (उद्योग) कादंबरी बलकवडे, ॲमेझॉन एडब्ल्यूएसचे कंट्री हेड संदीप दत्ता, ॲमेझॉन ग्लोबलचे कंट्री हेड समीर कुमार, एडब्ल्यूएसचे पब्लिक पॉलिसी संचालक विक्रम श्रीधरन, ग्लोबल ॲमेझॉनचे उपाध्यक्ष धर्मेश मेहता उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने देशातील अग्रणी राज्य आहे राज्याची अर्थव्यवस्था ६६० अब्ज डॉलर्स इतकी आहे. राज्याने २०३० पर्यंत ' वन ट्रिलियन डॉलर' अर्थव्यवस्था होण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यापैकी अर्धे अधिक उद्दिष्ट राज्याने पार केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोगावर आधारित विविध प्रयोग राज्याच्या शासन व्यवस्थेमध्ये करण्यात येत आहे. त्यामुळे निश्चितच नागरिकांना सुलभ आणि सहजरित्या शासकीय सेवांचा लाभ देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. कृषी, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित व्यवस्थांची उभारणी करण्यात येत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोगाने रोजगाराच्या स्वरुपामध्ये बदल होत आहेत. त्यामुळे या तंत्रज्ञानावर आधारित कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे अत्यंत गरजेचे आहे. महाराष्ट्र कौशल्य विकासामध्ये ॲमेझॉनसोबत काम करण्यास इच्छुक आहे. यासोबतच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांमध्ये महाराष्ट्र देशात अव्वल आहे. या क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोगावर आधारित कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात महाराष्ट्रात आवश्यक असलेली परिसंस्था विकसित करण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे डेटा सेंटर विकसित करण्यासाठी देण्यात येणाऱ्या सुविधांचा विस्तार करीत आहे. तसेच 'सार्वजनिक क्लाउड धोरण' लागू करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य आहे. यामध्ये यापूर्वीच ॲमेझॉनसोबत शासनाने पब्लिक क्लाऊडमध्ये काम केले आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी राज्याने स्वतःची डेटा सेंटर धोरण जाहीर केले आहे. ज्यामध्ये ' ग्रीन डेटा सेंटर' चा समावेश आहे. डेटा सेंटरसाठी पारंपारिक ऊर्जेच्या उपयोगाऐवजी अपारंपारिक क्षेत्रातून ऊर्जेचा उपयोग करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. ग्रीन डाटा सेंटरसाठी राज्याने सवलतीपण दिल्या आहेत.

नवी मुंबई येथे मेडिसिटी उभारण्यात येत आहे. या ठिकाणी संपूर्ण उपचार पद्धतीची साखळीच निर्माण करण्यात येणार आहे.

## मुंढेच्या बदलीसाठी २५० कोटी गोळा

**मुंबई/वृत्तसंस्था**

अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांची बदली करण्यासाठी औषध कंपन्यांनी २५० कोटी रुपये गोळा केल्याचा दावा राष्ट्रवादीचे (शरद पवार) जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत केला.

लक्षवेधी सूचनेद्वारे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कारभारातील त्रुटींवर सदस्यांनी प्रश्न उपस्थितीत केले. या वेळी बोलताना आव्हाड यांनी खळबळ जनक आरोप केला.

तुकाराम मुंढे चांगले काम करीत आहेत. भेसळखोरांवर कठोर कारवाई केली जात आहे. त्यांच्या कारवाईचा औषध कंपन्यांनी धसका घेतला आहे. जागतिक औषध कंपन्या त्यांच्या विरोधात एकवटल्या आहेत. त्यांनी मुंढे यांची बदल करण्यासाठी २५० कोटी रुपये जमा केले आहेत. त्यांच्या जीवाला धोका निर्माण



झाला आहे. समाज माध्यमांवरून त्यांनी जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. त्यामुळे सरकारने तुकाराम मुंढे यांनी संरक्षण द्यावे. त्यांनी तीन वर्षे त्यांची बदली करू नका, अशी मागणी आव्हाडांसह सर्वच सदस्यांनी केली. दरम्यान, मुंढे यांच्या बदलीसाठी अजून तरी झिरवाळ प्रयत्नशील असल्याचे दिसत नाही, त्या बद्दल झिरवाळ यांचे आभार मानले पाहिजे, असेही आव्हाड म्हणाले. त्याला उत्तर देताना, मुंढे चांगले काम करत आहेत. त्यांना थांबवले जाणार नाही, त्यांची बदली केली जाणार नाही.

## एकनाथ शिंदेंनी केली संजय दिना पाटलांची पाठराखण

**परभणी/वृत्तसंस्था**

गेल्या काही दिवसांपूर्वीच शिवसेना (ठाकरे) पक्षामधून फुटून शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केलेले खासदार संजय दिना पाटील यांनी आज पत्रकारांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. खासदार संजय दिना पाटील यांच्या या संदर्भातील वक्तव्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. संजय दिना पाटील यांच्या या वक्तव्यानंतर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.



या घटनेनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची देखील प्रतिक्रिया समोर आली आहे. खासदार संजय दिना पाटील यांचा पत्रकारांबद्दल असं बोलण्याचा कोणताही हेतू नव्हता, असं मला त्यांनी सांगितलं. पण तरीही मी त्यांना याबाबत पत्रकारांशी बोलून दिलगिरी व्यक्त करण्यास सांगितलं असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. "मी या सर्व प्रकरणाची सविस्तर माहिती घेतो आणि पुन्हा बोलतो. मात्र, मी आताच खासदार संजय दिना पाटील यांच्याशी बोललो. त्यांनी माझ्याकडे भावना व्यक्त केल्या की, पत्रकारांबद्दल चुकीचं वक्तव्य करण्याची माझी कोणतीही भावना नव्हती. माझे आणि पत्रकारांचे संबंध चांगले आहेत. पत्रकारांच्या भावना दुखावण्याचा माझा कोणताही हेतू नव्हता, असं मला संजय दिना पाटील यांनी सांगितलं आहे", असं स्पष्टीकरण एकनाथ शिंदे यांनी दिलं आहे.

"जे दररोज त्यांच्या विरोधात बोलतात, रोज त्यांच्याबाबत अपशब्द बोलतात. तोडून टाका, मारून टाका, तुडवा, अशा पद्धतीने खालच्या दर्जाचे जे शब्द वापरतात, मग तो देखील मीडियाचा अपमान आहे. किती दिवसांपासून काय-काय बोलतात ते आपण पाहिलं आहे. याचाच राग संजय दिना पाटील यांच्या मानामध्ये आहे. मात्र, पत्रकारांच्या बाबतीत संजय दिना पाटील यांच्या मनामध्ये कुठलाही राग नव्हता. पत्रकारांच्या बाबतीत अशा प्रकारचं वक्तव्य कोणत्याही लोकप्रतिनिधीने करू नये. त्यामुळे मी त्यांना सांगितलं की तुमच्याकडून जर पत्रकारांना काही शब्द गेले असतील तर पत्रकारांशी बोलून दिलगिरी व्यक्त करावी", असा सल्ला एकनाथ शिंदे यांनी संजय दिना पाटील यांना दिला आहे.

## 'मध्यभारताच्या विकासाचे इंजिन म्हणून नागपूर विमानतळ नावारूपाला येणार'

**नागपूर/वृत्तसंस्था**

नागपूर व परिसरात मेन्टेनन्स कमांड, ऑटो एव्हिएशन आणि डिफेन्स एव्हिएशन मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात मोठी गुंतवणूक होत आहे. या उद्योगांसह कृषी, पर्यटन आदींच्या विकासाला गती मिळून डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूर विमानतळ हे नागपूर, विदर्भ आणि मध्य भारतातील आर्थिक विकासाचे इंजिन म्हणून नावारूपाला येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

नागरी विमान वाहतूक मंत्री किंजारापू राममोहन नायडू, केंद्रीय रस्ते विकास व महामार्गमंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूर विमानतळ परिसरात आयोजित विमानतळ हस्तांतरण सोहळ्यात ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, देशात नवनवीन विमानतळ उभारले जात असताना नागपूर विमानतळ



मोठे व सुंदर करण्याचा आम्ही संकल्प केला. २०१८ मध्ये यासंदर्भात निविदा काढण्यात आल्या. २०१९ मध्ये जीएमआर कंपनी पात्र ठरली होती. मात्र या संदर्भात उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या आणि अखेर सकारात्मक निर्णय आला. केंद्राकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकल्पाला पूर्ण पाठिंबा दिला व केंद्रीय मंत्रिमंडळाने या प्रकल्पास मंजुरी दिली आणि आज रीतसरपणे या विमानतळाच्या आधुनिकीकरण, विस्तार आणि विकासाच्याहष्टीने जीएमआर कंपनीला विमानतळ हस्तांतरण करण्यात आले आहे. या विमानतळावर प्रवासी व कार्गो वाहतूक होण्यासाठी दोन टर्मिनल आणि दोन धावपट्ट्या होणे गरजेचे आहे. हस्तांतरणांमुळे आता हा मार्ग मोकळा झाला आहे. या विमानतळाला मेट्रो ट्रेन आणि रस्त्यांची उत्तम कनेक्टिव्हिटी देण्यात आली आहे. विमानतळाचा विस्तार लक्षात घेऊन येत्या काळात सुयोग्य कनेक्टिव्हिटी देण्याच्या दिशेनेही समांतर कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

येत्या एक वर्षात या विमानतळावर येणाऱ्या प्रवाशाला येथील सौंदर्य आणि सुविधेत अभूतपूर्व बदल दिसावा असे काम व्हावे. तसेच २०२९ पर्यंत या विमानतळाचे काम पूर्ण करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. राज्य शासनाकडून मिहान आणि एमआयडीसी अंतर्गत जागा उपलब्ध करून देण्यात येईल व आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. नागपूर व परिसर आणि विदर्भात होत असलेला उद्योग क्षेत्राचा विकास शेजारील तेलंगणा, छत्तीसगड व मध्यप्रदेश या राज्यांनाही मोठा फायदा होऊन या भागाच्या आर्थिक विकासासाठी हे विमानतळ महत्त्वपूर्ण ठरेल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

# इन्स्टावर रील आणि पिस्तुलांची डील; पुण्यातील कुप्रसिद्ध डीलर 'बबलू' लातूरमध्ये लॉक

■ मुंबई/वृत्तसंस्था

सोशल मिडियावरून खरेदी विक्री करणारा पिस्तुल डीलर "बबलू" याला पोलिसांनी अखेर पेड्या ठोकल्या आहेत. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने लातूरमध्ये बबलूला सापळा रचून अटक केली. बबलू इंस्टाग्रामवर फोटो अपलोड करून पिस्तुलांची खरेदी विक्री करत होता. पिस्तूलचा भलताच "शौक" असलेल्या बबलूचे सोशल मीडियावर अनेक फोटो व्हायरल झाले होते. अटक केलेल्या आरोपीकडून तब्बल ५ पिस्तुल आणि ७ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यातील पर्वती पोलिस ठाणे, खडक पोलिस ठाणे आणि वाघोली पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या वेगवेगळ्या गुन्ह्यात एक तरुण पोलिसांच्या रडार वर होता. संबंधित तरुण हा पिस्तूल विक्रेता असल्याची माहिती पोलिसांना होती. शेख अहमद उर्फ बबलु सुरज सय्यद असे या तरुणाचे नाव असून तो पुण्यातील बिबवेवाडी भागात राहणारा आहे. पुण्यातील अनेक गोळीबाराच्या घटनांमध्ये वापरले गेलेले पिस्तूल हे बबलू ने विक्री केल्याचं याआधी सुद्धा तपासातून समोर आलं होतं. या अनुषंगाने पुणे पोलिस त्याचा शोध घेत होते. गुन्हे शाखेच्या पोलिसांना बबलू हा लातूर जिल्ह्यातील एका गावात लपल्याची माहिती मिळालं होती. यानुसार गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने लातूर मध्ये जात सापळा रचून त्याला ताब्यात घेतलं. त्याच्याकडे अधिक तपास करता बबलू हा सोशल मिडीया वरुन गावठी पिस्टल सोबत फोटो काढुन ते प्रसारीत करत होता व पिस्टल व काडतुसे यांची खरेदी विक्री बाबत इंस्टाग्राम वरुन संपर्क साधत होता, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. आरोपी ने मध्यप्रदेश येथील उमरठी गावातील पिस्तूल विक्रेते यांच्या संपर्कात स्वतः राहुन त्याच्याकडून आपल्या ओळखीचे लोकांना तिथे पाठवुन मध्यस्थी करुन गावठी पिस्टल खरेदी करत असल्याचं सुद्धा समोर आलं आहे. पोलिसांनी त्याच्याकडून ५ पिस्तूल सह ७ जिवंत काडतुसे असा एकूण १ लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दरम्यान, आरोपीकडे आणखी काही पिस्तुल आहेत का? तसेच त्याने कोणाकोणाला पिस्तूल विकले होते याचा तपास सुरू आहे.

## इन्फ्लुएन्सरवर बलात्कार, व्हिडीओ शूट करण्याच्या बहाण्याने हॉटेलवर नेलं अन्...; धर्मांतरासाठी दबाव

■ दिल्ली/वृत्तसंस्था

दिल्लीमध्ये सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरवर बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. व्हिडीओ शूट करण्याच्या बहाण्याने तिला एका हॉटेलवर नेलं. त्याठिकाणी आरोपीने तिच्यावर बलात्कार केला. या प्रकरणी मंगळवारी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेमुळे दिल्ली हादरली. पोलिस सध्या या प्रकरणाचा तपास करत आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, दिल्लीतील बुराडी परिसरात ही घटना घडली. बुराडी येथील रहिवासी असलेल्या ३६ वर्षीय सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरवर हॉटेलमध्ये नेऊन बलात्कार करण्यात आला. बलात्कारानंतर आरोपीने भाऊ आणि मेहुण्याच्या मदतीने पीडितेवर धर्मांतर करण्यासाठी दबाव टाकला. पीडितेने या प्रकरणी बुराडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करत तपास सुरू केला आहे. पीडितेने ११ ने रोजी पोलिस मुख्यालयात तक्रार दाखल केली. तिने केलेल्या तक्रारीनुसार, ३६ वर्षीय पीडिता बुराडी येथे नवरा आणि १५ वर्षांच्या मुलीसोबत राहते. ती एक सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर असून घरातच व्हिडीओ शूट करून सोशल मीडियावर अपलोड करते. २०२२ मध्ये सनी नावाच्या एका व्यक्तीने इन्स्टाग्रामद्वारे तिच्याशी संपर्क साधला होता. २०२२ मध्ये सनी तिला भेटण्यासाठी बुराडीला आला होता. त्याने तिला रील शूटिंग करण्याच्या बहाण्याने एका हॉटेलमध्ये नेले आणि तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर आरोपीने तिला ब्लॅकमेल करून तिच्यावर अनेक वेळा बलात्कार केला. दरम्यान, पीडितेला समजले की, आरोपीचे नाव शकीब झरदारी असून तो अमरोहाचा रहिवासी आहे. त्यानंतर पीडितेने आरोपीपासून स्वत:ला दूर करण्यास सुरूवात केली. शाकिबपासून दूर झाल्यानंतर त्याचा भाऊ आणि मेहुण्याने तिला फोन करायला सुरूवात केली. त्यांनी तिच्या नवऱ्याच्या मोबाईलवर व्हिडीओ पाठवण्याची धमकी दिली आणि तिला बुराडी येथील एका मदरशात भेटायला बोलावले. मदरशातील एका हाफिजने धर्मांतर केल्यानंतर त्यांना ५.५० लाख रुपये देण्याचे वचन दिले. पीडितेने धर्मांतरासाठी नकार दिला. त्यानंतर २०२३ मध्ये तिन्ही आरोपींनी महिला आणि तिच्या मुलीवर धर्मांतर करण्यासाठी दबाव टाकण्यास सुरूवात केली. त्यानंतर पीडितेने ही बाब नवऱ्याला सांगितली.

वाद वाढल्यानंतर पीडिता जवळपास ३ वर्षे आरोपीपासून दूर राहिली. परंतु आरोपी तिला भेटत राहिला आणि तिच्यावर धर्मांतर करण्यासाठी दबाव टाकत राहिला. त्यानंतर या वर्षी ५ मे रोजी आरोपीने पीडितेच्या नवऱ्याच्या मोबाईलवर एक आक्षेपार्ह पोस्ट पाठवली. यानंतर तिच्या नवऱ्याने तिला घरातून हाकलून दिले. त्यानंतर पीडितेने या घटनेची माहिती पोलिसांना दिली. ज्यांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

## विवाहित पुरुषाचं अल्पवयीन मुली सोबत अमानुष कृत्य, वारंवार अत्याचार

■ नाशिक/वृत्तसंस्था

नाशिकमधून माणुसकीला काळिमा फासणारी घटना समोर आली आहे. दिंडोरी तालुक्यात एका विवाहित व्यक्तीने अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार केले. यानंतर ही मुलगी गरोदर राहिली. एवढ्यावरच न थांबता, प्रकरण उघडकीस येऊ नये म्हणून आरोपीने तिला पळवून नेले आणि प्रसूतीनंतर नवजात बाळासह एका निर्जन झोपडीत डांबून ठेवल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या प्रकरणी दिंडोरी पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केली असून पीडित मुलगी आणि तिच्या बाळाची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. रवींद्र मोरे असं या आरोपीचं नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी रवींद्र मोरे हा पीडित मुलीच्या शेजारी राहत होता. ओळखीचा फायदा घेत त्याने मुलीच्या विश्वासाचा गैरफायदा घेतला आणि तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याचा आरोप आहे. या अत्याचारांमुळे मुलगी गरोदर राहिली. मात्र, हा प्रकार उघडकीस येऊ नये आणि स्वतःवर कारवाई होऊ नये यासाठी आरोपीने पीडितेला पळवून नेल्याचे तपासात समोर आले आहे. आरोपीने मुलीला कानडी परिसरात नेले, जिथे तिने एका मुलाला जन्म दिला. प्रसूतीनंतर पीडितेची आणि नवजात बाळाची काळजी घेण्याऐवजी आरोपीने त्यांना सिन्नर तालुक्यातील पंचाळे येथील एका निर्जन झोपडीत ठेवले. बाहेरील जगापासून दूर ठेवून त्यांना तिथेच डांबून ठेवल्याचा आरोप आहे. दरम्यान, मुलगी बेपत्ता झाल्यानंतर तिच्या वडिलांनी दिंडोरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रार मिळताच पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. विविध ठिकाणी शोधमोहीम राबवत पोलिसांनी आरोपीचा माग काढला आणि त्याला अटक केली. त्यानंतर पीडित मुलगी आणि तिच्या नवजात बाळाची सुरक्षित सुटका करण्यात आली.

या घटनेची माहिती समोर आल्यानंतर दिंडोरीसह संपूर्ण नाशिक जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## तरुणीने बॉयफ्रेंडच्या मदतीने काटा काढला, आई-वडील अन् बहिणीला संपवलं




■ नागपूर/वृत्तसंस्था

बंगळूरुमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील एका अपार्टमेंटमध्ये एका कुटुंबातील तिघांची निर्घृण करण्यात आली आहे. या प्रकरणात कुटुंबातील मोठी मुलगी श्वेता हिच्यावरच हत्या केल्याचा आरोप असून तिने तिचा प्रियकर केनेथ याच्या मदतीने हा गुन्हा केल्याचा पोलिसांना संशय आहे. घटनेनंतर दोघेही फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्वेता तिच्या प्रियकरासोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होती. मात्र तिचे आई वडील सोमसुंदर आणि मुथुलक्ष्मी या नात्याला विरोध करत होते. याच कारणामुळे कुटुंबात वारंवार वाद होत असायचे आणि त्यातूनच ही घटना घडल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ही घटना केआर पुरम पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या साई ग्रीन अपार्टमेंट, धामनिक लेआउट, सीगेहल्ली येथे घडली. श्वेतावर तब्बल 30 लाख रुपयांचे कर्ज असल्याचेही समोर आले असून, यावरूनही घरात तणाव निर्माण झाला होता. माहितीनुसार, सोमवारी श्वेता तिच्या प्रियकरासोबत कुटुंबीयांना भेटण्यासाठी घरी आली होती. त्यावेळी घरात फक्त आई मुथुलक्ष्मी उपस्थित होती. वडील सोमसुंदर आणि धाकटी बहीण सुप्रिया बाहेर गेले होते. दरम्यान, श्वेता, केनेथ आणि मुथुलक्ष्मी यांच्यात जोरदार वाद झाला. या वादाच्या दरम्यान मुथुलक्ष्मी यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करून त्यांची हत्या करण्यात आली. त्यानंतर आरोपींनी बाथरूममध्ये रक्ताचे डाग धुवून टाकल्याचेही समोर आले आहे. थोड्याच वेळात सुप्रिया घरी परतली असता, श्वेताने तिला पकडले आणि केनेथने तिचीही हत्या केली. त्यानंतर दोघांनी मिळून वडील सोमसुंदर यांच्यावरही हल्ला केला. गंभीर जखमी अवस्थेत ते पळून जाण्यात यशस्वी झाले, मात्र नंतर त्यांचा मृत्यू झाला. पोलीसांनी घटनास्थळी पाहणी करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. आरोपी श्वेता आणि केनेथ यांचा शोध सुरू असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# लंकेचा आयर्लंडवर एकतर्फी विजय; ‘सामनावीर’ कर्णधार अटापटूचे नाबाद शतक

■ ब्रिस्टॉल/वृत्तसंस्था

कर्णधार चमारी अटापटूच्या दमदार नाबाद शतकाच्या जोरावर मंगळवारी येथे खेळविण्यात आलेल्या आयसीसी महिलांच्या टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील गट 2 मधील सामन्यात श्रीलंकेने आयर्लंडचा 27 चेंडू बाकी ठेवून 9 गड्यांनी दणदणीत पराभव केला. या विजयामुळे लंकेने या स्पर्धेत आता 4 गुण मिळविले आहेत.

या सामन्यात लंकेने नाणेफेक जिंकून आयर्लंडला प्रथम फलंदाजी दिली. आयर्लंडने 20 षटकांत 5 बाद 130 धावा जमविल्या. त्यानंतर लंकेने 15.3 षटकांत 1 बाद 134 धावा जमवित विजय नोंदविला.

आयर्लंडच्या डावात कर्णधार गॅबी लेव्हीसने 50 चेंडूत 8 चौकारांसह 59, ॲलिसी टेक्टरने 21 चेंडूत 3 चौकारांसह नाबाद 28, पॉलने 1 चौकारासह 20 तर स्टोकेलने 3 चौकारासह 13 धावा जमविल्या. लंकेतर्फे अयोध्या, सुगंधीका कुमारी, चमारी अटापटू आणि निलाक्षीका सिल्वा यांनी प्रत्येकी 1 गडी बाद केला. आयर्लंडच्या डावात 15 चौकार नोंदविले गेले. आयर्लंडने पॉवरप्ले दरम्यानच्या 6 षटकांत 30 धावा जमविताना 3 गडी गमविले. 14 षटकाअखेर आयर्लंडने 4 बाद 85 धावांपर्यंत मजल मारली होती. लेव्हीसने 40 चेंडूत 7 चौकारांसह अर्धशतक झळकविले.

प्रत्युत्तरादाखल खेळताना कर्णधार अटापटू आणि इमिशा दुलानी या सलामीच्या जोडीने 72 चेंडूत 98 धावांची भागिदारी केली. दुलानीने 27 चेंडूत 3 चौकारांसह 20 धावा जमविल्या. या भागिदारीमध्ये अटापटूचा वाटा 78 धावांचा होता. दुलानी बाद झाल्यानंतर सिल्वासमवेत अटापटूने विजयी चौकार ठोकून आपल्या संघाला मोठा विजय मिळवून दिला. अटापटूने 61 चेंडूत 2 षटकार आणि 17 चौकारांसह नाबाद 106 धावा झोडपल्या. सिल्वा 4 धावांवर नाबाद राहिली. लंकेने पॉवरप्ले दरम्यानच्या 6 षटकांत 55 धावा जमविल्या. अटापटूने 30 चेंडूत 10 चौकारांसह अर्धशतक तर 58 चेंडूत 2 षटकार आणि 16 चौकारांसह शतक झळकविले. या स्पर्धेतील अटापटूचे हे पहिले शतक आहे.

**संक्षिप्त धावफलक** : आयर्लंड 20 षटकांत 5 बाद 130 (लेव्हीस 59, ॲलिसी टेक्टर नाबाद 28, पॉल 20, स्टोकेल 13, अवांतर 9, अयोध्या, सुगंधिका कुमारी, अटापटू आणि सिल्वा प्रत्येकी 1 बळी), लंका 15.3 षटकांत 1 बाद 134 (चमारी अटापटू नाबाद 106, दुलानी 20, सिल्वा नाबाद 4, अवांतर 4, प्रेंडरगेस्ट 1-22)



## त्रीसा-गायत्री यांची आगेकूच, रौनक मुख्य फेरीत

■ कॅलिफोर्निया/वृत्तसंस्था

येथे सुरु झालेल्या यूएस ओपन बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या महिला दुहेरी जोडीने दुसऱ्या फेरीत धडक मारली. त्यांनी स्पेनच्या पॉला लोपेझ आणि लुसिया रॉड्रिग्ज यांच्याविरुद्ध तीन गेम्सच्या लढतीत विजय मिळवला. घोट्याच्या दुखापतीमुळे काही काळ खेळापासून दूर राहिल्यानंतर पुनरागमन करणाऱ्या ट्रीसाने, गायत्रीच्या साथीने 51 मिनिटे चाललेल्या पहिल्या फेरीच्या सामन्यात स्पॅनिश जोडीचा 21-12, 14-21, 21-13 असा पराभव केला. ही भारतीय जोडी आता जपानच्या सुमिरे नाकाडी आणि मियू ताकाहाशी यांच्याशी भिडणार आहे.

पुरुष एकेरीच्या पात्रता फेरीत रौनक चौहानने दोन विजय मिळवत मुख्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले. त्याने सुरुवातीला फ्रान्सच्या एनोगॅट रॉयचा 21-19, 21-16 असा पराभव केला आणि त्यानंतर चायनीज तैपेईच्या कुओ कुआन लिनवर 13-21, 21-14, 21-10 अशी मात केली. चौहान आता पहिल्या फेरीत सहकारी भारतीय खेळाडू एस.शंकर मुथुसामी सुब्रमण्यम याच्याशी सामना करेल.

ट्रीसा आणि गायत्री यांनीं दमदार सुरुवात करत पहिल्या गेममध्ये 8-3 अशी आघाडी घेतली. स्पॅनिश जोडीने सलग चार गुण मिळवून अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला असला तरी, भारतीय जोडीने पुन्हा सामन्यावर नियंत्रण मिळवले आणि 17-11 अशी मजल मारत सहजपणे तो गेम जिंकला. पॉला आणि लुसिया यांनी दुसऱ्या गेममध्ये चांगली




कामगिरी केली. त्यांनी मध्यंतरापर्यंत 11-7 अशी आघाडी घेतली. भारतीय जोडीने नंतर कडवी झुंज दिली असली तरी, स्पॅनिश जोडीने आपली आघाडी कायम राखत सामना निर्णायक गेमपर्यंत नेला.

तिसऱ्या गेमध्ये भारतीय जोडीने पुन्हा सामन्याची सूत्रे हाती घेतली आणि मध्यंतरार्यंत 11-6 अशी आघाडी घेतली. त्यानंतरही त्यांनी आपला वेग आणि लय कायम राखली व कोणत्याही मोठ्या अडचणीशिवाय सामना जिंकला. पाचवे मानांकन असलेल्या किदाम्बी श्रीकांत पुरुष एकेरीच्या मुख्य फेरीत सहकारी भारतीय खेळाडू सनीथ दयानंद याच्याशी भिडाणार आहे. रक्षित श्री संतोष रामराज, श्रीयांशी वालिशेट्टी, अनमोल खरब, देविका सिहाग, तान्या हेमंत, आकर्शी कश्यप आणि तन्वी शर्मा या स्पर्धकांसह महिला एकेरीतही भारताची लक्षणीय उपस्थिती असेल.

## विश्वनाथ आनंदला प्रतिष्ठित एसजेएफआय पुरस्कार

■ चेन्नई/वृत्तसंस्था

पाचवेळा जागतिक बुद्धिबळ विजेतेपद पटकावणाऱ्या विश्वनाथन आनंदला बुधवारी स्पोर्ट्स जर्नलिस्ट्स फेडरेशन ऑफ इंडियाचे पदक देऊन सन्मानित करण्यात आले. तामिळनाडू स्पोर्ट्स जर्नलिस्ट्स असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित एका कार्यक्रमात हा सन्मान प्रदान करण्यात आला.

सध्या फिडेचा उपाध्यक्ष असलेला आनंद आता सुनील गावस्कर, विजय अमृतराज, प्रकाश पदुकोण, पी.टी. उषा आणि जीव मिल्खा सिंग या सारख्या दिग्गजांच्या यादीत सामील झाला आहे. हा सन्मान स्वीकारल्यानंतर आनंद म्हणाला, भारतात बुद्धिबळाच्या प्रसारासाठी आणि विकासासाठी मी एक निमित्त ठरलो, याचा मला अभिमान वाटतो. हा सन्मान खूप खास आहे. कारण तो अत्यंत वस्तुनिष्ठ आहे, हे असे



लोक आहेत जे तुमच्या कामगिरीचे (तुम्ही प्रत्यक्ष काय केले याचे) कौतुक करतात. केवळ त्या कामगिरीचा काय परिणाम झाला किंवा इतर बाबींचा विचार करत नाहीत.’

येथील मद्रास क्रिकेट क्लबमध्ये भारताचे माजी कर्णधार आणि मुख्य निवडकर्ता कृष्णम्माचारी श्रीकांत यांच्या हस्ते आनंदला हे पदक प्रदान करण्यात आले.

## इराकला ३-० ने नमवून फ्रान्स बाद फेरीत

■ फिलाडेल्फिया/वृत्तसंस्था

फ्रान्सने इराकचा 3-0 असा पराभव करून बाद फेरीत प्रवेश केला असून यात त्यांचा मुख्य आघाडीपटू एमबाप्पेने दोन गोल केले. मागील तीन स्पर्धांत दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकण्याच्या दिशेने फ्रान्सच्या संघाला नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या एमबाप्पेकडून फ्रान्सला अशाच कामगिरीची अपेक्षा आहे.

आपल्या तिसऱ्या विश्वचषकात खेळताना एमबाप्पेने इराकविरुद्ध 14 व्या मिनिटाला गोल केला आणि आपल्या 100 व्या आंतरराष्ट्रीय सामन्यात फ्रान्सला 1-0 अशी आघाडी मिळवून दिली. या सामन्यात खराब हवामानामुळे मध्यांतराचा कालावधी दोन तासांपेक्षा जास्त वाढला. त्यानंतर 54 व्या मिनिटाला एमबाप्पेने पुन्हा गोल केला. या गोलसह त्याने जर्मनीच्या मिरोस्लाव क्लोसशी बरोबरी साधली. या विश्वचषकापूर्वी क्लोसच्या एकट्याच्या नावावर सर्वाधिक गोलचा विक्रम होता.

एमबाप्पेने सुमारे 20 यार्डावरून डाव्या पायाने जोरदार फटका मारत इराकचा गोलरक्षक अहमद बासिल याला चकवले आणि पहिला गोल केला. नॉर्वेविरुद्धच्या सामन्यात इराकचा पराभव झाला होता (4-1) आणि कर्णधार जलाल हसनने चारही गोल स्वीकारले होते. त्यानंतर या स्पर्धेत बासिलला पहिल्यांदाच सुरुवातीच्या फळीत खेळण्याची संधी मिळाली. आपल्या दुसऱ्या गोलसाठी एमबाप्पेला इराकी बचावपटू झैद तहसीनने गोलरक्षकाकडे दिलेल्या खराब पासचा फायदा झाला. फ्रान्सच्या उस्मान डेम्बेलेने तो मोकळा चेंडू आपल्या ताब्यात घेतला आणि एमबाप्पेकडे पास दिला. एमबाप्पेने आपल्या उजव्या पायाने चेंडू जाळीत सारला.

सामन्याच्या उत्तरार्धात मिळालेल्या एका संधीवर ‘रिअल माद्रिद’च्या या आघाडीपटूला हॅट्ट्रिक करण्याची संधी होती, पण ती हुकली आणि त्यानंतर 90 व्या मिनिटाला त्याला मैदानाबाहेर बोलावण्यात आले. डेम्बेलेनेही दुसऱ्या सत्रात गोल करत फ्रान्सच्या वर्चस्वपूर्ण कामगिरीवर शिक्कामोर्तब केले.

फ्रान्सच्या किलियन एमबाप्पेने इराकविरुद्ध दोन गोल करत आपल्या विश्वचषक कारकिर्दीतील एकूण गोलांची संख्या 16 वर नेली. या कामगिरीसह स्पर्धेच्या इतिहासात सर्वाधिक गोल करणाऱ्यांच्या यादीत तो जर्मनीच्या क्लोससह संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर पोहोचला असून नवीन विक्रमवीर मेस्सीशी बरोबरी करण्याचा प्रयत्न



करत आहे. 27 वर्षीय एमबाप्पे हा मेस्सीपेक्षा 11 वर्षांनी लहान आहे. त्यामुळे त्याला किमान आणखी दोन किंवा तीन विश्वचषक स्पर्धा मिळण्याची शक्यता आहे. एमबाप्पेने 2018 मध्ये फ्रान्सला विश्वचषक जिंकून देण्यात आणि 2022 मध्ये अंतिम फेरीपर्यंत पोहोचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्याने सेनेगलविरुद्धच्या स्पर्धेतील सलामीच्या सामन्यात आपला 13 वा आणि 14 वा विश्वचषक गोल नोंदवला होता.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन



# ऑफिसमधला रोमान्स अन् 'प्रेमाचा गेम', कशी आहे प्रेमाला कंडिशन्स अप्लाय सीरिज?

जेन-झी वेन-झी आणि त्यांचं विश्व हा चर्चेचा मोठा विषय आहे. याच पिढीची एक बाजू ' प्रेमाला कंडिशन्स अप्लाय ' या नव्याकोऱ्या मराठी सीरिजमध्ये दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ती एक बाजू म्हणजे त्यांचं 'डेटिंग लाइफ' आणि त्या पाठोपाठ येणारे त्याचे इतर पैलू. एवढ्या महत्त्वपूर्ण विषयाला चकाचक स्टाइलमध्ये कॉर्पोरेट ढंगात सादर करण्यात आलं आहे. पण त्यातही 'कंडिशन्स' आल्या की, प्रेमाला वेगळी किनार मिळते, नेमकं हेच सीरिजमध्ये दाखवलं जात आहे.ऋषी (सिद्धार्थ मेनन) हा टिपिकल कॉर्पोरेट लाइफ जगत असतो, तर अनन्या (जान्हवी उदय) नुकतीच कॉलेज संपल्यानंतर कॉर्पोरेटविश्वात प्रवेश करण्यास सज्ज असलेली तरुणी असते. पहिल्याच एपिसोडमध्ये निखिलकडे (मनमित पेम) पार्टी आयोजित केलेली असते, असं दाखवण्यात आलं आहे. तिथं ऋषी आणि अनन्या एकमेकांना पहिल्यांदा भेटतात. या पहिल्या



भेटीतच ते जवळ येतात. अगदी जेन-झीनुसार पहिल्या भागात सगळं काही 'इन्स्टंट' होताना दाखवलं आहे. जेन-झीच्या अलीकडील पिढी हा पहिला भाग पाहिल्यानंतर 'यांना सगळ्याची किती घाई असते' असं हमखास म्हणू शकते. योगायोग म्हणजे आदल्या दिवशीच्या पार्टीनंतर दुसऱ्या दिवशी या दोघांची भेट ऋषीच्या ऑफिसमध्ये होते. ऋषी काम करत असलेल्या कंपनीत अनन्याची इंटर्नशिप सुरू होते. त्यातही ती ऋषीच्याच टीममध्ये जाते. ही टिपिकल रुपरेषा वाचल्यानंतर प्रेक्षकांना वाटत असेल की, आता पार्टीतला रोमान्स कंपनीमध्ये सुरू राहणार. पण इथे येते एचआरची पॉलिसी, ती म्हणजे कामाच्या ठिकाणी 'नो डेटिंग'. आता या सगळ्यात ऋषी अनन्यामध्ये फुलणाऱ्या प्रेमाचं पुढे काय होतं? हा प्रश्न पडणं स्वाभाविक आहे. तर याचं उत्तर मिळवण्यासाठी सीरिज पाहायला हवी.ऋषी (सिद्धार्थ मेनन) हा टिपिकल कॉर्पोरेट लाइफ जगत असतो, तर अनन्या ( जान्हवी उदय ) नुकतीच कॉलेज संपल्यानंतर कॉर्पोरेटविश्वात प्रवेश करण्यास सज्ज असलेली तरुणी असते. पहिल्याच एपिसोडमध्ये निखिलकडे (मनमित पेम) पार्टी आयोजित केलेली असते, असं दाखवण्यात आलं आहे. तिथं ऋषी आणि अनन्या एकमेकांना पहिल्यांदा भेटतात. या पहिल्या भेटीतच ते जवळ येतात. अगदी जेन-झीनुसार पहिल्या भागात सगळं काही 'इन्स्टंट' होताना दाखवलं आहे. जेन-झीच्या अलीकडील पिढी हा पहिला भाग पाहिल्यानंतर 'यांना सगळ्याची किती घाई असते' असं हमखास म्हणू शकते. योगायोग म्हणजे आदल्या दिवशीच्या पार्टीनंतर दुसऱ्या दिवशी या दोघांची भेट ऋषीच्या ऑफिसमध्ये होते. ऋषी काम करत असलेल्या कंपनीत अनन्याची इंटर्नशिप सुरू होते. त्यातही ती ऋषीच्याच टीममध्ये जाते. ही टिपिकल रुपरेषा वाचल्यानंतर प्रेक्षकांना वाटत असेल की, आता पार्टीतला रोमान्स कंपनीमध्ये सुरू राहणार. पण इथे येते एचआरची पॉलिसी, ती म्हणजे कामाच्या ठिकाणी 'नो डेटिंग'. आता या सगळ्यात ऋषी अनन्यामध्ये फुलणाऱ्या प्रेमाचं पुढे काय होतं? हा प्रश्न पडणं स्वाभाविक आहे. तर याचं उत्तर मिळवण्यासाठी सीरिज पाहायला हवी.

## एखाद्याचा जीव घेणं जास्त सोपं झालंय, केतन अग्रवाल प्रकरणावर हिना खानचा संताप

पुण्यातील तरुण व्यावसायिक केतन अग्रवाल याच्या धक्कादायक हत्या प्रकरणानं संपूर्ण देशाला हादरवून सोडलं आहे. सुरुवातीला ट्रेकिंगदरम्यान झालेला अपघात समजल्या जाणाऱ्या या घटनेला तपासादरम्यान भयानक वळण मिळालं. केतनच्या होणाऱ्या पत्नीनंच (सिया गोयल) तिच्या प्रियकराच्या मदतीनं त्याला किल्ल्यावरून ढकलून दिल्याचं समोर आलं आहे. या क्रूर प्रकरणावर आता प्रसिद्ध टेलिव्हिजन अभिनेत्री हिना खान हिनं सोशल मीडियावरून तीव्र संताप आणि दुख व्यक्त केलं आहे.हिना खाननं तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर एक पोस्ट शेअर करत समाजातील बदलत्या मानसिकतेवर आणि आरोपींवर कडाडून टीका केली आहे.आजच्या काळात खरं ऐकणं आणि खरं बोलणं इतकं अवघड झालंय की, लोक कोणाचा जीव घ्यायलाही तयार होतात. सत्य स्वीकारण्यापेक्षा एखाद्याचा जीव घेणं जास्त सोपं झालंय असंच सध्या दिसतंय..."





पुढे आपल्या भावना व्यक्त करताना हिनाने आरोपी सिया गोयलला उद्देशून म्हटलं की, "तू फक्त एक खरं बोलून त्याला जिवंत सोडू शकली असतीस! त्याला सोडून तू तुझ्या आयुष्यात कोणत्याही XYZ व्यक्तीसोबत जगू शकली असतीस.. मग असं करण्याची काय गरज होती? का??" शेवटी तिने '#ketanmurdercase' असा हॅशटॅग वापरत या संपूर्ण घटनेबद्दल खंत व्यक्त केली आहे. लोहगड किल्ल्यावरील घटना: पुण्याच्या 'सक्सेस ग्रुप' या प्रसिद्ध रिअल इस्टेट फर्मचा २६ वर्षीय संचालक केतन अग्रवाल हा १८ जून रोजी त्याची होणारी पत्नी सिया गोयल हिच्या वाढदिवसानिमित्त लोणावळ्याजवळील ऐतिहासिक लोहगड किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी गेलाहोता.ट्रेकिंगदरम्यान केतनचा दरीत पडून मृत्यू झाला. सियानं पोलिसांना सांगितलं की, फोटो काढताना पाय घसरल्यानं केतन ४०० फूट खोल दरीत कोसळला. पोलिसांनी सुरुवातीला अपघाती मृत्यूची नोंद केली होती.केतन हा ट्रेकर असल्यानं त्याचा असा अपघात कसा होऊ शकतो, असा संशय त्याच्या कुटुंबीयांना आला. पोलिसांनी जेव्हा सियाच्या फोनची आणि पार्श्वभूमीची सखोल चौकशी केली, तेव्हा या भयंकर कटाचा पर्दाफाश झाला. सियाचे चेतन चौधरी नावाच्या तरुणासोबत गेल्या वर्षभरापासून प्रेमसंबंध होते. केतनशी लग्न न करता त्याचा काटा काढण्यासाठी सिया आणि तिच्या प्रियकराने हा प्लॅन रचला होता आणि त्यांनीच केतनला दरीत ढकलून दिलं. या प्रकरणात आता सिया आणि प्रियकर चेतन यांना अटक करण्यात आली आहे.

## आत्याच्या भाबड्या प्रश्नांनी आणलं जमिनीवर

काही दिवसांपूर्वी अभिनेत्री गिरिजा ओक तिच्या एका मुलाखतीमुळे भरपूर चर्चेत आली होती. आकाशी रंगाच्या साडी मधले तिचे फोटो आणि व्हिडिओ बरेच व्हायरल झालेले. त्यामुळे त्यावेळी तिला इंटरनेटवर नॅशनल क्रश अशी उपमा मिळू लागली. सर्वत्र गिरीजा ओक म्हणजे नॅशनल क्रश आहे असा गाजावाजा देखील झाला. त्यावेळी गिरीजा फारच चर्चेत आली होती.इंटरनेटवर मिळालेल्या नॅशनल क्रश या उपमेचा वैयक्तिक आयुष्यात कसा परिणाम झाला याबद्दल गिरीजाने नुकतेच एका मुलाखतीमध्ये सांगितले. जे सोशल मीडियावर नाहीत त्यांना नॅशनल क्रश म्हणजे काय हे काहीच माहित नाही. हे सर्व चालू असताना मला सतत लोकांचे फोन मेसेज वगैरे यायचे. त्यामुळे मला वाटू लागलेलं की सगळ्या जगाला आता फक्त एकाच गोष्टीचा ध्यास लागला आहे ते म्हणजे गिरिजा ओक नॅशनल क्रश. पण हे वाटू लागलं असतानाच मला माझ्या आत्याचा फोन आला.तिने मला फोनवर अत्यंत मूलभूत प्रश्न विचारले ते म्हणजे- हे काय आहे? नॅशनल क्रश म्हणजे काय? ते नॅशनल कसं ठरतं? तुला कुठल्या अधिकृत ठिकाणी हा पुरस्कार मिळाला आहे का? शासनाची याला मान्यता आहे का? कोणी दिला तुला हा पुरस्कार? या सगळ्या प्रश्नांची उत्तर देता देता मला जाणवलं की हे सगळं किती नगण्य आहे. या सगळ्याला काहीच अर्थ नाही. तिने मला विचारलं की ही गोष्ट कुठे जाहीर झाले तर मी तिला विचार करून इंटरनेटवर असं उत्तर दिलं. त्यावर ती मला म्हणाली की म्हणजे असं खरं काहीच घडलं नाहीये....त्यानंतर तिने मला काही महत्त्वाचे प्रश्न विचारले. ते ऐकून मला जाणवलं की ते सोशल मीडियावर नसले तरीही आपले लोक हे आपलेच असतात. तिने माझं सगळं ऐकून घेतलं. नॅशनल क्रश म्हणजे काय, ती उपमा कशी मिळते, सोशल मीडियावर फोटो व्हायरल होतात हे सगळं तिने जाणून घेतलं. त्यावर तिने मला दोन प्रश्न विचारले की हे बरं आहे का वाईट? मी तिला म्हटलं की हे बरं आहे आणि दुसरा प्रश्न तिने मला विचारला की तू ओके आहेस ना? तुला यात काही त्रास होत नाही आहे ना? यावर सुद्धा मी म्हणाले की मी बरी आहे. मग ती समाधानी म्हणाली की तू बरी आहेस ना मग ठीक आहे मग काही नको. मला जाणवलं की माझ्या लोकांना मी बरी आहे ना हे महत्त्वाचं आहे, मी नॅशनल क्रश आहे की कोण याचा त्यांना काहीही फरक पडत नाही.

## मेव्हणी बायकोची धाकटी बहीण नव्हे तर मुलगीच, वडिलांच्या डोक्यात संशयाचं भूत, अभिनेत्याच्या २० व्या बर्थडेला सगळंच संपलं

९० च्या दशकात बॉलिवूडमध्ये पहिल्याच सिनेमातून रोमँटिक हिरो म्हणून ओळख निर्माण करणारा आणि अभिनेत्री काजोलचा पहिला ऑन-स्क्रीन जोडीदार असलेला अभिनेता कमल सदाना याच्या आयुष्यात घडलेला एक प्रसंग सध्या चर्चेत आलाय.'बेखुदी' आणि 'रंग' सारख्या चित्रपटांमधून तुफान लोकप्रियता मिळवणाऱ्या कमल सदानाचा सिनेप्रवास प्रचंड चढ-उतारांचा आणि संघर्षानं भरलेला राहिला आहे.२१ ऑक्टोबर १९९० रोजी कमल सदानाचा २० वा वाढदिवस होता. घरात आनंदाचं वातावरण होतं, मित्र गोळा झाले होते आणि केक कापण्याची तयारी सुरू होती. कमलच्या घरात खालच्या मजल्यावर त्याचे वडील जे प्रसिद्ध चित्रपट निर्माते-दिग्दर्शक ब्रिज सदाना आणि आई सईदा खान यांच्यात काही कारणावरून जोरदार वाद सुरू झाला.दारूच्या नशेत असलेल्या ब्रिज सदाना यांनी रागाच्या भरात बंदूक काढली अन् पत्नीला संपवलं. गोळ्यांचा आवाज ऐकून कमल जेव्हा खाली धावला, तेव्हा



त्यानं पाहिलं की त्याच्या आई आणि बहीण (नम्रता)खाली पडल्या होत्या.आई आणि बहिणीला वाचवण्यासाठी कमल पुढं सरसावला, तेव्हा त्याच्या वडिलांनी त्यालाही मारण्याचा प्रयत्न केला, तो जेखील गंभीर जखमी झाला. यानंतर ब्रिज सदाना यांनी स्वतःवरही गोळी झाडून आयुष्य संपवलं . एका क्षणात हसतं-खेळतं कुटुंब उद्ध्वस्त झालं. मलाही गोळी लागली होती. जेव्हा मी रुग्णालयात शुद्धीवर आलो, तेव्हा मला सांगण्यात आलें की माझी आई आणि बहीण आता या जगात नाहीत आणि वडिलांनीही स्वतःला संपवलं आहे. खरं तर चमत्कारिकरित्या तो वाचला होता. पण मनावर झालेल्या जखमा कधीच भरून निघणाऱ्या नव्हत्या. या घटनेनंतर अनेक वर्षे कमलनं आपला वाढदिवस साजरा करणं बंद केले होतं.विशेष म्हणजे, ज्या घरात ही इतकी मोठी शोकांतिका घडली, कमल आजही त्याच घरात राहतो. कमलनं एका मुलाखतीत सांगितलं होतं की, त्याचे बालपण आणि कुटुंब खूप छान होते, पण एका चुकीच्या नशेत आणि रागाच्या भरात त्याच्या वडिलांकडून हे भयानक पाऊल उचललं गेलं. काही रिपोर्ट्सनुसार असंही म्हटलं जातं की,ब्रिज सदाना त्यांच्या पत्नीवर सतत संशय घ्यायचे. त्यांची पत्नी सईदा यांना एक धाकटी बहीण होती. पण ही त्यांची बहीण नसून लेक असल्याचा संशय त्यांना होता. अशा अफवाही इंडस्ट्रीत पसरल्या होत्या. मासिकांतही अशा गोष्टी लिहून आल्या होत्या. यानंतर सईदा यांची धाकटी बहीण शगुफ्ता हिनं एक खळबळजन खुलासा केला, की तिला दत्तक घेण्यात आलं होतं. तेव्हा ब्रिज सदाना यांना मोठा धक्का बसला. या चर्चा, अफवांमुळं ते पत्नीवर जास्तच संशय घेऊ लागले. याच रागातून त्यांनी स्वतःच्या पत्नीला आणि लेकीला संपवलं होतं.ब्रिज सदाना हे बॉलिवूडमधील एक मोठं नाव होतं. त्यांनी 'व्हिक्टोरिया नं. २०३' आणि 'दो भाई' यांसारखे अनेक सुपरहिट चित्रपट दिग्दर्शित आणि प्रड्यूस केले होते. त्यांनी अभिनेत्री सईदा खान यांच्याशी लग्न केलं होतं. त्यांना नम्रता नावाची मुलगी आणि कमल नावाचा मुलगा होता. वरून सुखी दिसणाऱ्या या कुटुंबात अंतर्गत मोठे वाद सुरू होते. ब्रिज सदाना यांना दारूचं प्रचंड व्यसन लागलं होतं आणि यामुळे पती-पत्नीमध्ये रोज भांडणे होत असत.३२ वर्षांनंतरही ही घटना बॉलिवूडच्या इतिहासातील सर्वात काळी आणि वेदनादायी घटना मानली जाते. इतक्या मोठ्या मानसिक धक्क्यातून सावरून कमल सदानाने पुन्हा आपले आयुष्य उभं केलं. यानंतर तो काजोलसोबत 'सलाम वेंकी' (2022) आणि त्यानंतर लष्करी पार्श्वभूमीवर आधारित 'पिप्पा' (2023) या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये दिसला होता.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेसाठी राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसोबत समन्वय बैठक...

**जनसंचलन/बुलढाणा**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण कुमार देवरे यांच्या अध्यक्षतेखाली २२ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात विविध मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसोबत समन्वय बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार उपस्थित होत्या. बैठकीत विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेचा उद्देश, मतदार याद्यांची अचूकता व अद्ययावतीकरणाची प्रक्रिया, तसेच निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. पात्र मतदारांची नोंदणी, नवमतदारांचा समावेश, मृत अथवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे आणि मतदार याद्यांमधील त्रुटी दूर करण्यासाठी राजकीय पक्षांचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. देवरे यांनी मतदार यादी पुनरिक्षण प्रक्रियेत सर्व संबंधितांनी सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन केले. मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि सर्वसमावेशक करण्यासाठी प्रत्येक स्तरावर दक्षता घेण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.बैठकीदरम्यान उपस्थित पदाधिकाऱ्यांनी विविध सूचना व मुद्दे मांडले. त्यावर निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी आवश्यक मार्गदर्शन करून शंकांचे निरसन केले. विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रशासन आणि राजकीय पक्षांनी संयुक्तपणे कार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. बैठकीस विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी तसेच निवडणूक विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# जोरदार वारे-बावधनामुळे शकुंतला भिकाजीराव डिघोळे व भिकाजी बाबुराव डिघोळे यांच्या सौर ऊर्जा प्रकल्पांचे नुकसान भरपाईची मागणी




**जनसंचलन/बुलढाणा**


२३ जून २०२६ रोजी सायंकाळच्या सुमारास झालेल्या जोरदार वारे-बावधन आणि पावसामुळे किनगाव राजा शिवारातील अनेक शेतकऱ्यांच्या सोलर पंप प्रकल्पांचे नुकसान झाले. विशेषतः शेतकरी शकुंतला भिकाजीराव डिघोळे यांच्या गट क्रमांक ३२५ मधील सोलर पंपाच्या प्लेट्सवर मोठ्या प्रमाणात झाडांच्या फांद्या व वेली कोसळल्याने प्लेट्सचे नुकसान झाले असून वीज निर्मितीवर परिणाम झाला आहे. तसेच भिकाजी बाबुराव डिघोळे यांच्या गट क्रमांक २३७ मधील सोलर पंपाच्या प्लेट्स देखील वारे-बावधनामुळे नुकसानग्रस्त झाल्या आहेत. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे परिसरातील झाडांच्या फांद्या तुटून सोलर पॅनेलवर पडल्याने काही प्लेट्स खराब झाल्या असून संपूर्ण यंत्रणेची कार्यक्षमता कमी झाली आहे. शेतकऱ्यांनी मोठा खर्च करून उभारलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे शेतीसाठी पाणीपुरवठा केला जातो. मात्र या नैसर्गिक आपत्तीमुळे सोलर पंपांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांसमोर सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. नुकसान झालेल्या प्लेट्सची दुरुस्ती व बदल करण्यासाठी मोठा आर्थिक खर्च अपेक्षित असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. शेतकऱ्यांची मागणी संबंधित महसूल, कृषी व महाऊर्जा विभागाने तात्काळ पंचनामा करून नुकसानीचे मूल्यांकन करावे तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून आर्थिक मदत व भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी शकुंतला भिकाजीराव डिघोळे व भिकाजी बाबुराव डिघोळे यांनी केली आहे. २३ जून २०२६ रोजी झालेल्या वारे-बावधनामुळे आमच्या शेतातील सोलर पंपाच्या प्लेट्सचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे सिंचन व्यवस्था प्रभावित झाली असून शासनाने तात्काळ पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

# जिल्ह्याच्या सुपुत्राकडे आरोग्य विभागाची धुरा; डॉ. रणजीत मंडाले यांची जिल्हा आरोग्य अधिकारीपदी नियुक्ती

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या जिल्हा आरोग्य अधिकारी (डीएचओ) पदाची धुरा जिल्ह्याचे सुपुत्र तथा सिंदखेडराजा तालुक्यातील पळसखेड चक्का येथील रहिवासी डॉ. रणजीत मंडाले यांच्या हाती सोपविण्यात आली आहे. शासनाच्या आदेशानुसार त्यांची जिल्हा आरोग्य अधिकारी, बुलढाणा म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आरोग्य सेवेत विविध जबाबदाऱ्यांवर कार्य करताना डॉ. मंडाले यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले असून त्यांच्या प्रशासनिक अनुभव, कार्यतत्परता आणि लोकाभिमुख दृष्टिकोनामुळे त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी ग्रामीण रुग्णालय, देवळगाव मही येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवेला सुरुवात केली. त्यानंतर मलकापूर-पांगरा प्राथमिक आरोग्य केंद्रात तसेच मेहकर येथे तालुका आरोग्य अधिकारी म्हणून त्यांनी प्रभावीपणे जबाबदारी सांभाळली. त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत शासनाने त्यांची अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारीपदी नियुक्ती केली होती. जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर शासनाच्या सर्व आरोग्य योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यास प्राधान्य देणार असल्याचे डॉ. मंडाले यांनी सांगितले. तसेच जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि गतिमान करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने कार्य करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. डॉ. रणजीत मंडाले यांच्या नियुक्तीबद्दल जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेला नवे नेतृत्व लाभले असून नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली बुलढाणा जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक प्रभावी, गतिमान आणि लोकाभिमुख होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त २६ जून रोजी सामाजिक न्याय दिन साजरा



**जनसंचलन/बुलढाणा**

राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २६ जून हा दिवस ङ्कसामाजिक न्याय दिनफ म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त यंदाही सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय बुलढाणा आणि जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाच्या वतीने जिल्हाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. समाजकल्याण विभागाच्या वतीने २६ जून २०२६ रोजी संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात सामाजिक न्याय, समता आणि सर्वसमावेशक विकासाचा संदेश देणारे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये जनजागृती कार्यक्रम, सामाजिक न्याय विषयक मार्गदर्शन, तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांना देण्यात येणार आहे. या निमित्ताचा मुख्य कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बुलढाणा येथे शुक्रवार, दि. २६ जून रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमात राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार असून सामाजिक न्यायाच्या मूल्यांचा प्रसार करण्यावर भर दिला जाणार आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, विविध संस्थांचे प्रतिनिधी तसेच लाभार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग बुलढाणा डॉ. मनोज मेरत यांनी केले आहे.

# जिल्ह्यात स्टॉप डायरिया अभियान २०२६ प्रभावीपणे राबवूया : मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात

**जनसंचलन/बुलढाणा**

पावसाळ्यात दूषित पाणी, अस्वच्छता आणि वैयक्तिक स्वच्छतेच्या अभावामुळे अतिसारजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या वतीने स्टॉप डायरिया अभियान २०२६फ राबविण्यात येत आहे. हे अभियान १६ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येणार असून, सर्व संबंधित विभागांनी तसेच नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषद बुलढाणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी केले आहे. अतिसार हा विशेषतः पाच वर्षांखालील बालकांसाठी जीवघेणा ठरू शकणारा आजार असून, सुरक्षित पिण्याचे पाणी, साबणाने हात धुण्याची सवय, परिसर स्वच्छता आणि योग्य स्वच्छताविषयक पद्धतींचा अवलंब केल्यास या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळविता येते, असे त्यांनी सांगितले. नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करून प्रतिबंधात्मक उपाय अधिक बळकट करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आरोग्य विभाग, ग्रामपंचायत, पाणी व स्वच्छता विभाग, शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग तसेच विविध सामाजिक संस्थांच्या समन्वयातून हे अभियान राबविले जाणार आहे. अभियानांतर्गत तालुका व ग्रामस्तरावर बैठका आयोजित करण्यात येणार असून ग्रामपंचायती, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्या, शाळा आणि अंगणवाडी केंद्रांमधून व्यापक जनजागृती केली जाणार आहे. गावनिहाय पाणी गुणवत्तेची तपासणी करून सर्व जलस्रोतांची नियमित चाचणी केली जाईल. विद्यार्थी आणि स्वयंसेवकांना फील्ड टेस्ट किटच्या माध्यमातून पाणी तपासणीचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ग्रामीण पाणीपुरवठा यंत्रणेतील गळती दुरुस्ती, पाणी साठवण टाक्यांची स्वच्छता व निर्जंतुकीकरण, तसेच पिण्याच्या पाण्याचे नियमित क्लोरीनीकरण करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. नळाद्वारे पुरवठा होणाऱ्या पाण्यात किमान ०.२ पीपीएम मुक्त अवशिष्ट क्लोरीन राखण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# महिला व बालविकास विभागातील संरक्षण अधिकाऱ्यास एसीबीची ने १२ हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडले.



**जनसंचलन-बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागातील संरक्षण अधिकारी तुषार रमेश राणे यांना अँटी करप्शन ब्युरोने १२ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. तक्रारदाराच्या दिव्यांग मुलीस कांतीज्योती बालसंगोपन योजनेअंतर्गत मिळालेल्या आर्थिक मदतीच्या बदल्यात तसेच भविष्यातील लाभ मिळवून देण्यासाठी २४ हजार रुपयांची लाचेची मागणी करण्यात आली होती. या प्रकरणात जळगाव जामोद येथील तालुका शेतकरी खरेदी-विक्री सहकारी समिती कार्यालयासमोर सापळा रचून कारवाई करण्यात आली. यावेळी १२ हजार रुपयांचा पहिला हप्ता स्वीकारताना तुषार राणे यांना एसीबीने ताब्यात घेतले. या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# संजय दिना पाटलांची मग्रुरी आणि मुजोरी, पत्रकारांना जीवे मारण्याची धमकी...

**जनसंचलन-बुलढाणा**

कशाला माझ्या मध्ये घुसताय? परत आला तर मारून टाकेन; संजय दिना पाटलांची मग्रुरी आणि मुजोरी, पत्रकारांना जीवे मारण्याची धमकी खासदार संजय दिना पाटील पुन्हा वादात सापडले आहेत. शिवसेना शिंदे गटात नुकतेच गेलेल्या पाटील हे पत्रकारांशी बोलत असताना संतापले. त्यांनी पत्रकारांवर अरेरावी करत शिवीगाळ केली. एवढेच नाही तर त्यांनी पत्रकारांना मारण्याची धमकीही दिली. त्यांच्या या कृतीमुळे राजकीय वर्तुळात नवा गदारोळ निर्माण झाला असून, आधीच्या वादग्रस्त वक्तव्यांनंतर आता ही घटना त्यांच्यासाठी नवीन अडचणी घेऊन आली आहे. आठवड्याभरापूर्वी शिवसेना ठाकरे गटातून फुटून शिवसेना शिंदे गटात गेलेल्या सहा खासदारांपैकी एक, खा. संजय दिना पाटील हे सध्या चांगलेच चर्चेत आहेत. त्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे गदारोळ माजला, संजय राऊतांनी त्यावर लेटर बॉम्ब टाकला. संजय दिना पाटील याच्या वक्तव्यामुळे एकनाथ शिंदे हे देखील नाराज झाले. तेच संजय दिना पाटील आता पुन्हा चर्चेत आले आहेत, मात्र ते अगदीच चुकीच्या कारणामुळे. माध्यमांशी संवाद साधताना संजय दिना पाटील हे भडकले, संतापले आणि रागाच्या भरात त्यांची जीभ चांगलीच घसरली. संजय दिना पाटील यांनी पत्रकारांवर अरेरावी केली तसेच त्यांना शिवीगाळही केली. पत्रकारांच्या प्रश्नावर उत्तर देताना संजय पाटील यांनी अतिशय अर्वाच्च भाषा वापरली. एवढंच नव्हे तर त्यांनी पत्रकारांना मारण्याची भाषा करत धमकीही दिली. मुंबईत संजय दिना पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला. संजय राऊतांनी केलेले आरोप यावर त्यांनी उत्तर दिलं. शिंदे आपल्यावर नाराज नाही तर त्यांनी शाबासकी दिली असं सांगत संजय दिना पाटील हे विविध विषयंवर बोलले. मात्र बराच वेळ बोलून झाल्यावर ते निघत असताना एका पत्रकाराने त्यांना आणखी राजूल पाटील, नक्की कुठे यासंदर्भात प्रश्न विचारला असता ते चांगलेच संतापले. रागाच्या भरात बोलताना त्यांची जीभ घसरली. त्यांनी माध्यमांना शिवीगाळ करत थेट धमकी दिली. माझं हे बघू नका तुम्ही, अती करताय. ए भाई बस ना, बंद कर ना आता, बंद कर नाहीतर मी विसरून जाईन की मी खासदार आहे तरतुम्ही काय आहे ते अशा शब्दात संजय दीना पाटील हे पत्रकारांशी बोलत होते. त्यावर माध्यम प्रतिनिधींनी शांततेची भूमिका स्वीकारत हो, हो असं म्हटलं, आम्ही चाललोय असं सांगितलं, तरीही संजय दिना पाटील यांची मग्रुरी, त्यांचा माज कायम होता. मी इज्जत करतो, इज्जत करा सांगतोय परत असं म्हणत त्यांनी पत्रकारांसमोरच शिव्यांची लाखोली वाहिली. मी इज्जत करतो, उगाच डोक्यात जाऊ नका. घराखाली उभं करतोय तुम्हाला, जेवायला देतोय . काय, उगाच त्यांच्याकडे जाल. परत आला ना तर मारून पाठवणार तुम्हाला, जे बोलायचं, जे लिहायचं ते लिहा अशी थेट धमकीही संजय दिना पाटील यांनी दिली. एवढंच नव्हे तर, लिहा, रेकॉर्ड करा आणि सांगा तिकडे कमिशनरकडे जाऊन कम्प्लेंट करा अशी मग्रुरीही त्यांनी दाखवली. इज्जत करतो, तुम्हाला सहन करतोय, खूप दिवस सहन केलं. मग अजून कशाला घुसताय अरे लिमिट आहे कुठल्या गोष्टीची.. बोललीय ना ती.. सागितलं ना सर्व त्याने काही बोलू दे.. अरे काही बोलू दे.. तुझ्या गेलं असं म्हणत, रेकॉर्ड करा आणि सांगा , तुम्ही आता मला विचारायला आले तर मार खाणार ..अशा शब्दांत संजय दिना पाटील यांनी शिवीगाळ केली. त्यांच्या या वक्तव्यामुळे चांगलाच रोष पसरला असून विरोधकांनीही नाराजी व्यक्त केली आहे.

